RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष १, अंक ५७(३)] सोमवार, जून १, २०१५/ज्येष्ठ ११, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ११८

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जून २०१५

**आदेश**

**महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१.**

क्रमांक मत्स्यवि. १११५/प्र. क्र. १३७/पदुम-१४.––महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (१९८१ चा महा. ५४), च्या कलम ४ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, उक्त कलम ४ च्या पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेल्या बाबी लक्षात घेऊन, उक्त अधिनियमाच्या कलम ३ अन्वये रचना करण्यात आलेल्या सल्लागार समितीशी विचारविनिमय केल्यानंतर आणि केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालय (पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग) ज्ञापन क्रमांक ३००३५/१५/९७-एफआय (टी-१)/भाग-चार, दिनांक १० एप्रिल २०१५ अन्वये, शासन आदेश कृषि व सहकार विभाग, क्रमांक एफडीएक्स-१४८१/२२१६७/१८१/१२-पदुम, दिनांक १६ ऑगस्ट १९८३ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

उक्त आदेशातील खंड ३ मध्ये, शब्द, अंक, अक्षर आणि कंस "१५ जून रोजी सुरू होणाऱ्या व १५ ऑगस्ट रोजी संपणाऱ्या (दोन्ही दिवस धरून)" या ऐवजी शब्द, अंक, अक्षर आणि कंस "१ जून रोजी सुरू होणाऱ्या व ३१ जुलै रोजी संपणाऱ्या (दोन्ही दिवस धरून)" असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श. मा. साठे,**
शासनाचे उप सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 1st June 2015

### Order

MAHARASHTRA MARINE FISHING REGULATION ACT, 1981.

No. Matsyavi. 1115/C.R. 137/ADF-14.—In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Marine Fishing Regulation Act, 1981 (Mah. LIV of 1981), the Government of Maharashtra, having regard to the matters referred to in sub-section (*2*) of the said section 4, and after consultation with the Advisory Committee constituted under section 3 of the said Act, and in view of the directions issued by the Government of India, Ministry of Agriculture (Department of Animal Husbandry, Dairying and Fisheries) *vide* office memorandum No. 30035/15/97-Fy (T-1) Vol. IV, dated the 10th April 2015, hereby amends the Government order, Agriculture and Co-operation Department, No. FDX 1481/22167/181/12-ADF, dated the 16th August 1983, as follows, namely :—

In Clause (*iii*) of the said Order, for the words, figures, letters and brackets " Commencing on the 15th June and ending on the 15th August (both days inclusive) ", the words, figures, letters and brackets " Commencing on the 1st June and ending on the 31st July (both days inclusive) " shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. M. SATHE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.